ePaper
न्यूझीलंडमध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक, सांगितली खास आठवण

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




मोशी दुर्घटनेचा पिंपरी चिंचवड शहरावर परिणाम

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 12 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ३२ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी नाव समुद्रात बुडाली

# व्हिएतनाममध्ये मोठी दुर्घटना!



**महाईन्यूज । व्हिएतनाम**

**व्हिएतनाममधील समुद्रात एक मोठी दुर्घटना घडली असून, पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट समुद्रात बुडाली आहे. या बोटीमधून ३२ भारतीय पर्यटक प्रवास करत होते, अशी माहिती समोर आली आहे. तसेच समुद्रामध्ये शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.**

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार सुमारे ३२ भारतीय पर्यटकांना घेऊन जात असलेली ही बोट नियंत्रण सुटून व्हिएतनाममधील प्रसिद्ध फु क्वोक बेटाजवळ बुडाली. बोट बुडाल्यानंतर त्यातील पर्यटकांनी मदतीसाठी आरडा ओरडा करण्यास सुरुवात केली. दरम्यान, या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. तसेच प्रशासनाने तातडीने मदत कार्य सुरू केलं. दरम्यान, दुर्घटनाग्रस्त बोटीमधून एकूण ३६ लोक प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी २१ जणांना सुरक्षित वाचवण्यात आले आहे. तर या दुर्घटनेत १५ जणांचा मृत्यू झाला आहे.

व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने सोशल मीडियावर पोस्ट करत या दुर्घटनेच्या वृत्ताला दुजोरा दिला. भारतीय दुतावासाने लिहिले की, व्हिएतनामच्या फू क्वोक बेटाजवळ काही तासांपूर्वी झालेल्या अत्यंत दु:खद दुर्घटनेत भारतीय पर्यटकांना घेऊन जात असलेली एक नाव बुडाली. या दुर्घटनेबाबत अधिक माहिती मिळवली जात आहे. तसेच दुर्घटनेनंतर बेपत्ता असलेल्यांचा शोध घेण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांकडून शोध आणि बचाव अभियान राबवले जात आहे. दरम्यान या घटनेशी संबंधित काही व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान समुद्रात उलटलेली बोट दिसताच जवळच्या इतर पर्यटक बोटी तात्काळ मदतीसाठी घटनास्थळी धावून आल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले.

### पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिएतनाममधील घटनेनंतर एक्सवर पोस्ट शेअर करत शोक व्यक्त केला. “व्हिएतनाममधील फु क्वोकजवळ घडलेली बोट अपघाताची दुःखद बातमी ऐकून अत्यंत दुःख झाले. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्या कुटुंबियांप्रति माझ्या मनपूर्वक संवेदना व्यक्त करतो. भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास सर्वतोपरी मदत करत आहे”, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी दिली. व्हिएतनाममध्ये मागच्या वर्षी एक मोठी नौका दुर्घटना घडली होती. त्यानंतर आता हा अपघात घडल्यामुळे खळबळ उडाली आहे. जुलै २०२५ मध्ये हा लाँग बे येथे अचानक आलेल्या वादळात २० मुलांसह ४८ जणांना घेऊन जाणारी पर्यटक बोट उलटली होती. या दुर्घटनेत ३५ प्रवाशांचा मृत्यू झाला होता.

### दूतावासाने दिली अपघाताची माहिती

व्हिएतनामच्या फु क्वोक बेटाजवळ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची माहिती मिळत आहे. या दुर्घटनेनंतर बचावकार्य सुरू करण्यात आले असून भारतीय दूतावासाने स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून बचावकार्याची माहिती घेतली. व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहेत. दरम्यान दुर्घटनेत आतापर्यंत १५ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती रॉयटर्स वृत्तसंस्थेने दिली आहे. दूतावासाने एक्स अकाऊंटवरून या अपघाताची माहिती दिली. “काही तासांपूर्वी फु क्वोक बेटाजवळ अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची एक दुःखद घटना घडली आहे. घटनेचा तपशील मिळवला जात आहे. स्थानिक प्रशासन बचाव आणि शोध कार्य करत आहे”, अशी माहिती पोस्टमध्ये देण्यात आली आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला पुन्हा विलंब

## सीएमआरएसचे सुरक्षा प्रमाणपत्र रखडले; १० लाख आयटी कर्मचारी

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनासाठी पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार आहे. माण ते बालेवाडी या पहिल्या टप्प्यावर १५ जुलैपासून मेट्रोसेवा सुरू करण्याचे नियोजन 'पीएमआरडीए'कडून करण्यात आले होते. मात्र, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून (सीएमआरएस) अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र अद्याप प्राप्त झाले नसल्याने हा मुहूर्तही हुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



### प्रकल्प खर्चात २० टक्के वाढ

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील सर्व स्थानकांवर सेवा सुरू होण्यास पुढील वर्षीचा मार्च महिना उजाडणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यास मुदतीपेक्षा एक वर्षांहून अधिक काळ लागल्याने एकूण खर्चात सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. हा खर्चाचा बोजा पुणे आयटी सिटी मेट्रो रेल (पीआयटीसीएमआरएल) कंपनी उचलणार आहे. गणेश खिंड रस्त्यावर मेट्रोचे काम करण्यास विलंब लागल्याने हा प्रकल्प रखडल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. दरम्यान, प्रकल्पाच्या उर्वरित कामांना गती देण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

माण ते बालेवाडीदरम्यानच्या १२ स्थानकांची सुरक्षा तपासणी नुकतीच सीएमआरएसकडून पूर्ण करण्यात आली आहे. मात्र, तपासणीनंतरचा अंतिम अहवाल आणि व्यावसायिक प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेले सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय मेट्रोसेवा सुरू करता येणार नाही. त्यामुळे सर्व तांत्रिक कामे पूर्ण झाली असली, तरी प्रवाशांसाठी मेट्रो सुरू करण्यास अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही.

पीएमआरडीएच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीएमआरएसचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतरही विविध तांत्रिक, प्रशासकीय आणि कार्यान्वयनाशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान दोन आठवड्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे जुलैमध्ये मेट्रो सुरू होण्याची शक्यता कमी असून, ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात सेवा सुरू होणार आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा सुरू होण्याची प्रतीक्षाच असून, आता या सेवेसाठी नवीन मुहूर्त काढण्यात आला आहे. ही सेवा जुलैच्या अखेरीस अथवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मेट्रोमुळे आयटी कर्मचाऱ्यांसह लाखो पुणेकरांचा प्रवास सुकर होणार आहे. परंतु, ही सेवा सुरू होत नसल्याने त्यांची वाहतूक कोंडीतून लवकर सुटका होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारी ही पुण्यातील तिसरी मेट्रो मार्गिका आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड कंपनीसमवेत राबविण्यात येत आहे. ही सेवा गेल्या वर्षी मार्च महिन्यात सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, कामे अपूर्ण असल्याने ती सुरू झाली नाही. त्यानंतर अनेक मुहूर्त जाहीर करण्यात आले; परंतु गेल्या सव्वा वर्षात ही सेवा सुरू होऊ शकली नाही.

खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्चमध्ये पुण्यात एका कार्यक्रमात या मेट्रोचा पहिला टप्पा मे महिन्यात आणि दुसरा टप्पा जुलैमध्ये सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, तेही फोल ठरले. त्यानंतर मेट्रो सेवेचा पहिला टप्पा १५ जुलैपासून सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले. आता हे नियोजनही कोलमडले असून, ही सेवा जुलैच्या अखेरीस अथवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे नवीन नियोजन करण्यात आले आहे. पीएमआरडीएचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री फडणवीस आणि महानगर आयुक्त डॉ. चौधरी यांनी विकसक कंपनी 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड'ला वारंवार वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीही सेवा सुरू होण्यात सातत्याने होणारा विलंब हा प्रकल्पातील समन्वयाच्या अभावावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण नाही; सुप्रिया सुळे

**महाईन्यूज । पुणे**

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार असल्याच्या राजकीय चर्चांना खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी फेटाळून लावले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, पक्षात कोणतीही नाराजी नसल्याचा दावा करीत त्यांनी सुरू असलेल्या तर्क-वितर्कांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.**



### विलीनीकरण नाही

महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समन्वयाचे राजकारण सुरू असल्याचे मान्य करतानाच त्याचा अर्थ पक्षांचे विलीनीकरण असा होत नसल्याचेही त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट झाले. निवडणुकांमध्ये जागा वाटप, प्रचार आणि रणनीतीच्या पातळीवर सहकार्य होऊ शकते; मात्र प्रत्येक पक्षाचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व कायम राहील, असे संकेत त्यांनी दिले.

पत्रकारांशी संवाद साधताना सुळे म्हणाल्या, 'आमची व काँग्रेसची विलिनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. माध्यमांमध्ये किंवा राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही.' त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांना कोणताही आधार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पक्षातील अंतर्गत नाराजीबाबत विचारले असता सुळे यांनी मिश्किल शैलीत उत्तर दिले. 'पक्षात कोणीही नाराज नाही आणि कोणी नाराज असेल, तरी तो बाहेर येऊन बोलणार नाही,' असे त्या म्हणाल्या. त्याचबरोबर पक्षात सर्व काही सुरळीत असल्याचा संदेश देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस यांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर सुळे यांनी भूमिका स्पष्ट करीत विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव किंवा चर्चा नसल्याचे सांगितले. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत निर्माण झालेल्या तर्कांना त्यांनी उत्तर दिले.

सुळे यांच्या या स्पष्टीकरणामुळे महाविकास आघाडीतील राजकीय समीकरणांबाबत सुरू असलेल्या चर्चांना काही प्रमाणात विराम मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून विविध शक्यतांवर चर्चा रंगत आहे.

# मोशी दुर्घटनेचा पिंपरी चिंचवड शहरावर परिणाम

## पर्यायी डम्पिंग व्यवस्था नसल्याने महापालिकेसमोर मोठे आव्हान

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**मोशी कचरा डेपो येथे झालेल्या भीषण दुर्घटनेचा फटका आता संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराला बसू लागला आहे. दुर्घटनेनंतर डेपोवरील कामकाज मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्याने शहरातील घनकचरा संकलन आणि विल्हेवाट व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. कचरा टाकण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने अनेक भागांमध्ये कचरा संकलन रखडले असून नागरिकांच्या घरातील कचऱ्याचे डबे तुडुंब भरले आहेत. परिणामी, महापालिकेकडे तक्रारींचा ओघ वाढत आहे.**



> कचरा संकलन व्यवस्थेवर परिणाम झालेला नाही. केवळ मोशी कचरा डेपोवर कचरा डम्पिंग बंद आहे. आम्ही पर्यायी जागेचे नियोजन केले आहे. त्या ठिकाणी कचरा साठवला जात आहे. सर्व भागातील संकलन सुरळीत सुरू आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता महानगरपालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला सहकार्य करावे.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, आरोग्य विभाग.

महापालिकेच्या दैनंदिन कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार मोशी कचरा डेपोवर अवलंबून आहे. मात्र दुर्घटनेनंतर डेपो परिसरात बचावकार्य, यंत्रसामग्रीची हालचाल आणि सुरक्षेच्या कारणास्तव नियमित कचरा विल्हेवाट प्रक्रियेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांतून संकलित होणारा कचरा वेळेत डेपोपर्यंत पोहोचत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

शहरातील अनेक सोसायट्या, गृहनिर्माण संस्था आणि दाट लोकवस्तीच्या भागांत दोन ते तीन दिवसांपासून कचरा उचलला गेला नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. घरातील ओला कचरा साचल्याने दुर्गंधी पसरू लागली असून डास, माशा आणि अस्वच्छतेची समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते, अशी नागरिकांची चिंता आहे.

नागरिकांकडून महापालिकेच्या हेल्पलाइन, प्रभाग कार्यालये तसेच सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदवल्या जात आहेत. नियमितपणे कचरा उचलला जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, तातडीने पर्यायी व्यवस्था करून कचरा संकलन पूर्ववत करण्याची मागणी जोर धरत आहे.

मोशी दुर्घटनेने शहराच्या घनकचरा व्यवस्थापनातील एक मोठी उणीवही अधोरेखित केली आहे. तब्बल लाखो लोकसंख्या असलेल्या शहरासाठी एकाच डेपोवर अवलंबून राहणे किती धोकादायक ठरू शकते, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत कचरा विल्हेवाटीसाठी पर्यायी जागा, अतिरिक्त प्रक्रिया केंद्रे आणि संकट व्यवस्थापनाची ठोस यंत्रणा उभारण्याची गरज आता प्रकर्षाने पुढे आली आहे.

दरम्यान, कचरा संकलन आणि विल्हेवाट व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध पर्यायांची चाचपणी सुरू असल्याची माहिती मिळत असली, तरी प्रत्यक्षात नागरिकांना दिलासा मिळण्यासाठी ही व्यवस्था किती लवकर कार्यान्वित होते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## वायसीएम रुग्णालयाची संरक्षक भिंत धोकादायक; मागील बाजूची भिंत खचली

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**शनी मंदिर ते फुलेनगर या अत्यंत वर्दळीच्या मार्गालगत असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या (वायसीएम) संरक्षक दगडी भिंतीचा मोठा भाग खचल्याने गंभीर अपघाताची भीती निर्माण झाली आहे. भिंतीवर बसविण्यात आलेले लोखंडी ग्रीलही सध्या धोकादायक अवस्थेत असून, ते कोणत्याही क्षणी रस्त्यावर कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**



> भिंतीची पाहणी करण्यात आली आहे. भिंतीच्या आवश्यक दुरुस्ती करण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. सुरक्षिततेच्यादृष्टीने त्या ठिकाणी संरक्षण टेप लावण्यात आली आहे. सैल झालेले साहित्य काढून पुन्हा काँक्रीटचे काम करावे लागणार असल्याने हे काम पूर्ण होण्यासाठी अंदाजे तीन ते चार दिवस लागतील. या रस्त्यावर प्रवासी रिक्षांची सतत ये-जा असते. भिंत खचली किंवा ग्रील रस्त्यावर पडले तर मोठा अपघात होऊ शकतो. पावसाळ्यात धोका अधिक वाढला आहे. प्रशासनाने तातडीने भिंतीची दुरुस्ती करून रस्ता सुरक्षित करावा.
>
> - प्रीती बिजवे, कनिष्ठ अभियंता, ल क्षेत्रीय कार्यालय, महापालिका

घटनेनंतर संबंधित विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून धोकादायक भागाभोवती सुरक्षा फीत लावून परिसर बंदिस्त केला आहे. मात्र, केवळ फीत लावून प्रशासनाने जबाबदारी झटकली असून, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यात भिंत आणखी खचण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शनी मंदिर ते फुलेनगर हा रस्ता परिसरातील महत्त्वाचा दुवा मानला जातो. फुलेनगरमधील शाळांमध्ये जाणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना दररोज याच मार्गाचा वापर करावा लागतो. पुढे असलेल्या डी. वाय. पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचीही या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. याशिवाय महिला, ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार तसेच पादचारी यांची दिवसभर वर्दळ असते. रस्त्याच्या समोर पोळी-भाजी केंद्रांची दुकाने, इतर व्यावसायिक आणि रहिवासी घरे असल्याने या परिसरात नेहमीच गर्दी असते.

याच रस्त्यावरून भोसरी, मोशी आणि चाकण परिसरातील नागरिक तसेच रुग्ण वायसीएम रुग्णालयात उपचारासाठी ये-जा करतात. याशिवाय रिक्षांचीही या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, भिंत कोसळल्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अनेक ठिकाणी संरक्षक भिंती कोसळण्याच्या घटना घडत आहेत. अशा पार्श्वभूमीवर वायसीएम रुग्णालयाची ही भिंत अधिक खचल्यास किंवा लोखंडी ग्रील रस्त्यावर कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, रुग्ण, रिक्षाचालक आणि दुचाकीस्वार यांच्यासाठी हा धोका अधिक गंभीर असल्याचे नागरिकांनी सांगितले.

नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने या भिंतीची पाहणी करून धोकादायक भाग हटविण्याची, लोखंडी ग्रील सुरक्षितरीत्या काढून टाकण्याची आणि नवीन मजबूत संरक्षक भिंत उभारण्याची मागणी केली आहे.



## भूमिका

**तत्कालीन सोव्हिएत युनियनकडून निर्माण झालेल्या धोक्याला प्रतिसाद म्हणून नाटोची स्थापना झाली, हे खरे असलेतरी तिच्या निर्मितीमागे तीन विशेष उद्दिष्टे होती. ती म्हणजे, सोव्हिएत विस्तारवाद रोखणे, युरोप खंडात अमेरिकेच्या मजबूत उपस्थितीद्वारे राष्ट्रवादी लष्करीकरणास प्रतिबंध करणे.**

# नाटो परिषदेतील सावळा गोंधळ




नाटोच्या स्थापनेनंतर सोव्हिएत युनियन या नेतृत्वाखाली साम्यवादी देशांची वारसा करार संघटना स्थापना झाली. तिथे प्रतिक्रियात्मक उद्दिष्ट नाटो सारखेच, पण नाटोविरोधी होते. सोव्हिएत युनियनच्या अस्तानंतर वारसा करार संघटना अस्तंगत झाली, परंतु नाटो जिवंत राहिली. आज नाटोच्या स्थापनेपासून 76 वर्षांनंतरचा योगायोग हा की, तेव्हाही नाटोच्या प्राधान्य क्रमावर रशियन विस्तारवादाचा धोका होता आणि आजही तोच आहे. आताची शिखर परिषद अशा वेळी होत होती, जेव्हा रशियन आक्रमणाचा सामना करणाऱ्या युक्रेनला पाठिंबा कायम ठेवण्याचा, शस्त्रास्त्र पुरवठा करण्याचा आणि ड्रोन, हवाई संरक्षण व वेगवान तांत्रिक विकासामुळे बदललेल्या युद्धस्थितीशी जुळवून घेण्याचा दबाव नाटोवर आहे.

नाटोच्या स्थापनेपासून तिच्या खर्चाचा 60 टक्क्यांहून अधिक भार संस्थापक सदस्य अमेरिकेकडून उचलला जाई. ट्रम्पना हे धोरण ‘पांढरा हत्ती’ पोसल्यासारखे वाटू लागले. नाटो कालबाह्या झाली आहे, अमेरिकेच्या पैशावर नाटोला पोसणे अशक्य आहे, अशी टोकाची विधाने ट्रम्पनी केली होती. परिणामी गतवर्षी हेग येथे झालेल्या नाटो परिषदेत सदस्य युरोपीय देशांनी, आपली संरक्षण विषयक तरतूद देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सरासरी 2 टक्क्यांवरून 2035 सालापर्यंत 5 टक्क्यांवर नेण्यासाठीची वचनबद्धता दर्शवली. मात्र ही वचनबद्धता स्पेनने नाकारली आणि ब्रिटनसह बरेच देश अपेक्षेपेक्षा मंदगतीने लक्ष्याकडे वाटचाल करत असल्याचे चित्र आहे. गेल्याच महिन्यात अमेरिकेच्या लष्करी मुख्यालय पेंटागॉनने आपल्या नाटो मित्र राष्ट्रांना, त्यांच्यापैकी कोणावरही हल्ला झाल्यास पुरवण्यात येणाऱ्या सैन्य, युद्धनौका, विमाने आणि ड्रोनची संख्या कमी केली जाईल, असे जाहीर करून आश्चर्याचा ‘दु:खद’ धक्का दिला आहे. इराणविरुद्ध युद्धात नाटो राष्ट्रांनी घेतलेल्या असहकार्याच्या भूमिकेचा हा परिणाम आहे. या शिखर परिषदेच्या आधी ट्रम्प यांनी नाटोकडून निष्ठेची अपेक्षा व्यक्त केली. जर ही शिखर परिषद तुर्कस्तानचे अध्यक्ष रेसेप तय्यिप यांनी आयोजित केली नसती तर कदाचित आपण ती पूर्णपणे टाळली असती, असे ट्रम्प म्हणाले. तुर्कस्तानने अलिकडच्या वर्षात केवळ आपला संरक्षण खर्चच वाढवला नाही, तर तो नाटोच्या सर्वात मोठ्या लष्करी निर्यातदारांपैकी एक बनला आहे हे ध्यानात घेता ट्रम्प यांच्या इतर नाटो देशांकडूनच्या अपेक्षा स्पष्ट होतात. नाटोच्या सर्व 32 देशांचे नेते या परिषदेत उपस्थित होते. या शिवाय दोन अलिप्त देशांचे, अर्थात युक्रेनचे झेलेन्स्की आणि दक्षिण कोरियाचे ली जे-म्युंग, तसेच ऑस्ट्रेलिया, जपान व न्युझिलंडचे प्रमुख मंत्री, इराण युद्धाची झळ बसलेल्या बहरीन, कुवेत, कतार व अरब अमिरातीचे मंत्रीगण यांचीही हजेरी होती.

## प्रासंगिक »

### वाईट सवयींचा त्याग

**एक व्यापारी अत्यंत प्रामाणिक, नम्र आणि मनमिळाऊ होता; पण त्याचा मुलगा उद्धट आणि गर्विष्ठ होता. मुलाला सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही यश आले नाही.**

शेवटी व्यापाऱ्याने त्याला आपल्या मित्रा-कडे काही दिवसांसाठी पाठवले. एके दिवशी मित्र त्याला बागेत घेऊन गेला. प्रथम त्याने लहान रोप उपटायला सांगितले. मुलाने ते सहज उपटले. नंतर मोठे रोप उपटण्यासा-ठी खूप मेहनत घ्यावी लागली. शेवटी एका मोठ्या वृक्षाकडे बोट दाखवत तो उपटण्यास सांगितले. मुलाने ते अशक्य असल्याचे सांगितले. त्यावर मित्र म्हणाले, "वाईट सवयीं-चेही असेच असते.

सुरुवातीला त्या सहज सोडता येतात; पण त्या मनात खोलवर रुजल्या की त्यांचा त्याग करणे अत्यंत कठीण होते." हा संदेश मुलाच्या मनाला भिडला. त्याने आपल्या उद्धट वागण्याचा त्याग करून नम्र, विनम्र आणि सुस्वभावी होण्याचा निश्चय केला. काही दिवसांत त्याच्या स्वभावात सकारात्मक बदल झाला आणि तो सर्वांचा लाडका बनला.

- तात्पर्य : वाईट सवयी सुरुवातीलाच सोडल्या तरच जीवन सुखी, यशस्वी आणि सुसंस्कृत बनते.

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी डिसेंबर २०२६ मध्ये मायदेशी परत जाऊन न्यायालयासमोर स्वेच्छेने शरणागती पत्करण्याची घोषणा केली आहे. "मला अटक होऊ शकते, मला ठारही मारले जाऊ शकते; तरी मी परतणार," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# ढाक्याकडे पुनरागमन की लोकशाहीची अग्निपरीक्षा?



या घोषणेमुळे बांगलादेशातील राजकारण नव्या टप्प्यावर पोहोचले असून, हा केवळ एका नेत्याच्या पुनरागमनाचा प्रश्न नसून लोकशाही, न्यायव्यवस्था आणि राजकीय परिपक्वतेची कसोटी आहे.

२०२४ मधील विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले आणि त्यानंतर त्या भारतात आश्रयास आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशाने आर्थिक विकास, महिलांचे सक्षमीकरण, वस्त्रोद्योगाचा विस्तार आणि दारिद्र्यात घट यांसारख्या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली. मात्र, विरोधकांवरील कारवाई, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध आणि सत्तेचे वाढते केंद्रीकरण यामुळे त्यांच्या कार्यकाळावर गंभीर टीकाही झाली. त्यामुळे त्यांच्या राजकीय वारशाबाबत आजही मतभेद कायम आहेत.

आज शेख हसीना यांच्यावर विविध गंभीर आरोप आहेत. मात्र, त्यांच्यावरील न्यायप्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक आणि आंतरराष्ट्रीय न्यायमानदंडांनुसार होणे अत्यावश्यक आहे. न्यायालयांचा वापर राजकीय सूडासाठी झाला, तर त्याचा परिणाम केवळ एका व्यक्तीवर मर्यादित राहणार नाही; तर संपूर्ण बांगलादेशच्या लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासालाच धक्का बसेल.

या घडामोडींचा परिणाम केवळ बांगलादेशापुरता मर्यादित नाही. भारताने शेख हसीना यांना आश्रय दिला आहे, तर ढाका सरकारने त्यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली होती. त्यामुळे त्यांचे संभाव्य पुनरागमन भारत-बांगलादेश संबंधांसाठीही महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच चीन, अमेरिका आणि इंडो-पॅसिफिकमधील सामरिक समीकरणांवरही या घटनाक्रमाचे परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण दक्षिण आशियाचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.

बांगलादेशसमोर आज मोठी संधी आहे. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसते; ती सत्ताबदलानंतरही न्याय, संवाद आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्यात असते. जर शेख हसीना यांच्यावर निष्पक्ष सुनावणी झाली, तर बांगलादेश जगासमोर परिपक्व लोकशाहीचे उदाहरण ठेवू शकतो. अन्यथा राजकीय प्रतिशोधाचा मार्ग स्वीकारल्यास देशाच्या लोकशाही संस्थांची विश्वासार्हता गंभीरपणे प्रश्नांकित होईल. शेख हसीना डिसेंबरमध्ये ढाक्यात परततील की नाही, याचे उत्तर भविष्यात मिळेल. मात्र त्या परतल्यानंतर बांगलादेश लोकशाहीचा मार्ग स्वीकारतो की प्रतिशोधाचा, यावर त्या देशाच्या भविष्यासह संपूर्ण दक्षिण आशियाच्या राजकीय स्थैर्याची दिशा अवलंबून असेल.

## ।। अभंगवाणी ।।



देवापाशीं मागें आवडीची भक्ति ।
विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥

तुका म्हणे मना सांगतों विचार ।
धरावा निर्धार दिसेंदिस ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शरद पवारांकडून महायुतीचं कौतुक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील शरद पवार यांचे आभार मानले

महाईन्यूज । मुंबई

**विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील अटीशर्तीबाबत मोठी घोषणा केली. ज्या शेतकऱ्यांनी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेला होता, त्या शेतकऱ्यांचं ५० हजारांऐवजी आता २ लाखांपर्यंतचं कर्ज माफ होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाचं शरद पवारांनी देखील कौतुक केलं आहे. दरम्यान, शरद पवारांनी महाराष्ट्र सरकारचं कौतुक केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील शरद पवार यांचे आभार मानले आहेत.

"शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मी विधानसभेत सांगितलं की, याआधी झालेल्या कोणत्याही कर्जमाफीच्या योजनेत लगतच्या कर्जमाफीत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्यात आलेला नव्हता. पण आपण पहिल्यांदा हा निर्णय केला. महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा ज्या शेतकऱ्यांनी लाभ घेतला होता, त्यांना आधी आपण ५० हजार रुपयांपर्यंत लाभ देणार होतो. मात्र, सत्ताधारी सर्व आमदारांचा आग्रह होता की शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी द्या, आपण देखील ती मागणी मान्य केली. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे", असं मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं."सततची नैसर्गिक आपत्ती, शेतमालाचे कोसळलेले दर या पार्श्वभूमीवर सरकारने कर्जमाफी योजना जाहीर केली होती. मात्र, सदरील कर्जमाफी योजनेत शासनाने २०१९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा कमाल लाभ देण्याची घातलेली अट तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सन २०२५-२६, २०२६-२७ चे पीककर्ज भरण्याची घातलेली अट, यामुळे लाखो शेतकरी कर्जमाफी योजनेपासून वंचित राहण्याचा धोका होता. पण राज्यभरातील शेतकऱ्यांची भावना लक्षात घेता आज शासनाने दोन्ही जाचक अटी मागे घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला, त्याबद्दल सरकारचे आभार", असं शरद पवार यांनी म्हटलं होतं.

### मुख्यमंत्री फडणवीसांनी शरद पवारांचे मानले आभार

महायुती सरकारने कर्जमाफी योजनेतील दोन जाचक अटी रद्द केल्याबद्दल शरद पवार यांनी सरकारचं कौतुक केलं, यावर तुमची प्रतिक्रिया काय? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "शरद पवारांनी कौतुक केलं, त्याबाबत मी त्यांचा आभारी आहे." हे पाऊल राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून, सरकार सकारात्मक निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील कोणती अट रद्द?

"आता ज्या शेतकऱ्यांनी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेला आहे, त्यांना ५० हजार रुपयांची अट घातली होती. त्या माध्यमातून ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार होता. मात्र, आता महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही थेट २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. त्याचबरोबर २०२६-२७ चा कर्ज भरण्याच्या संदर्भातील नियम वगळण्यात येईल. गेल्या तीन पैकी दोन वर्षात ज्यांनी पैसे भरले ते देखील आता कर्जमाफीसाठी पात्र होतील", अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

# 'मिसिंग लिंक'वरुन इतका आकांडतांडव करण्याची गरज नाही

महाईन्यूज । मुंबई

**"कोणताही मोठा प्रकल्प होत असताना त्यात छोट्या-मोठ्या चुका होतच असतात. त्यामुळे मिसिंग लिंक प्रकरणावरून एवढा आकांडतांडव करण्याची गरज नाही. विरोधकांच्या वृत्तीवर आक्षेप घेत, "९९% काम चांगले झाले असताना सर्वच काम खराब झाले असे म्हणणे चुकीचे आहे.**



"पिक्चर संपल्यावर नवीन पिक्चर सुरू करणे एवढे सोपे नसते, त्यासाठी नट तसा असावा लागतो," अशा शब्दांत त्यांनी एकनाथ खडसेंनाही लक्ष्य केले.

माध्यमांशी बोलताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या वादावर सरकारच्या भूमिकेचे समर्थन केले. ते म्हणाले, "आजपर्यंत कोणत्याही सरकारच्या काळात झाली नाहीत एवढी कामे महायुती सरकारच्या काळात झाली आहेत. समृद्धी महामार्ग आणि ग्रामीण रस्तेही या काळात सुधारले आहेत. एखादा मोठा प्रकल्प करताना किरकोळ चुका होतात, पण ९९% काम चांगले झाले असताना केवळ चुकांवरून राजकारण करणे योग्य नाही."

विनोद तावडे आणि एकनाथ खडसे यांच्या भेटीवर गुलाबराव पाटील म्हणाले की, यांची भेट कशासाठी घेतली हे माहिती नाही. पिक्चर संपल्यावर नवीन पिक्चर सुरू करणे एवढे सोपे नसते, त्यासाठी नट कसा असावा लागतो. इतना तुटा हु चुनें से बिखर जाऊंगा, तुम अगर और दुवा देंगे तो मर जाऊंगा, अशा खास शायरीतून त्यांनी खडसेंवर निशाणा साधला. त्या घरात जाऊन आता खडसेंना काहीही भेटणार नाही. ते केवळ कुटुंबियांची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही टोलाही त्यांनी लगावला.

श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून खासदार ओम बिर्लांना भेटले. श्रीकांत शिंदे हे आमच्या पक्षाचे युवा नेते आहेत. एक खासदार दुसऱ्या खासदाराला किंवा लोकसभा अध्यक्षांना भेटू शकतो, यात काहीही विशेष किंवा चुकीचे नाही," असेही गुलाबराव पाटील यांनी स्पष्ट केले.

### मोटेगावकर वर पेपर फुटी प्रकरणात कारवाई

राज्यात एका मोटेगावकर वर पेपर फुटी प्रकरणात कारवाई होते पण राज्यात असे शेकडो मोटेगावकर आजही खासगी शिकवणी वर्ग घेत आहेत असे जगन्नाथ अभ्यंकर यांनी आरोप केला. आम्हाला साधी वाढदिवसाची जाहिरात टीव्हीवर करणे परवडत नाही पण हे खासगी शिकवणी वर्ग वाले कोट्यवधी रुपयांची दिवसभर जाहिरात करत असल्याचे इंद्रिस नायकवडी यांनी सांगितले.

# गुरुग्राममध्ये मध्यरात्री थरार!

## ६० हून अधिक गोळ्या झाडल्या; १० कोटींच्या खंडणीसाठी आलेल्या ४ शार्पशूटर्सचा एन्काऊंटर

महाईन्यूज । नवी दिल्ली

**हरियाणातील गुरुग्रामच्या उच्चभ्रू अशा सुशांत लोक परिसरात गुरुवारी रात्री पोलिस आणि पाच शार्पशूटर्समध्ये झालेल्या चकमकीत चार जण ठार झाले, तर एक जण गंभीर जखमी झाला. या चकमकीत तीन पोलिस कर्मचारीही गोळीबारात जखमी झाले. पोलिसांच्या माहितीनुसार, यूकेमधील गँगस्टर दीपक नंदाल याने १० कोटी रुपयांच्या खंडणीसाठी या शार्पशूटर्सना एका उद्योगपतीच्या घरी पाठवले होते.**



खंडणीच्या धमक्यांबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकांना काही दिवसांपासून परिसरात तैनात करण्यात आले होते. स्कॉर्पिओ येताच पोलिसांनी आरोपींना शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, त्यांनी पोलिसांवरच गोळीबार सुरू केला. त्यानंतर सुमारे दोन मिनिटे जोरदार चकमक उडाली.

पोलिसांच्या माहितीनुसार आरोपींनी स्वयंचलित PX 30 पिस्तुलांमधून ४० गोळ्या झाडल्या, तर दोन्ही बाजूंनी मिळून ६० हून अधिक राऊंड फायर झाले. परिसरात नागरिक असल्याने पोलिसांना प्रत्युत्तर देणे भाग पडले.

चकमकीत दीपा उर्फ संदीप (३५), नितीन (२२), अंकित (१८) आणि १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा ठार झाले आहेत. अल्पवयीन आरोपी शाळेच्या भालाफेक संघाचा खेळाडू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शिवम नावाचा आणखी एक आरोपी गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या कारवाईदरम्यान शिपाई मनजीत सिंह, शमशेर सिंह आणि सहाय्यक उपनिरीक्षक सुनील कुमार यांना गोळ्या लागल्या. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

डीसीपी (गुन्हे) हितेश यादव यांनी टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले की, आरोपी उद्योगपतीची हत्या करण्याच्या उद्देशानेच आले होते. गँगस्टर दीपक नंदाल मोठ्या प्रमाणात खंडणी उकळत असून त्याच्याविरोधात खून, खंडणी आणि गोळीबाराचे अनेक गुन्हे दाखल आहेत. उद्योगपतीला यापूर्वीही त्याने अनेक धमक्या दिल्या होत्या.

घटनास्थळावरून पोलिसांनी पाच पिस्तुले, ५० हून अधिक रिकामी काडतुसे, जिवंत काडतुसे आणि गोळ्या लागलेली स्कॉर्पिओ जप्त केली आहे. फॉरेन्सिक आणि बॅलिस्टिक टीमने घटनास्थळाची तपासणी केली असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी डीएलएफ सेक्टर-२९ पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र कायदा, खुनाचा प्रयत्न आणि बीएनएस (BNS) अंतर्गत खुनाचा प्रयत्न व संघटित गुन्हेगारीचे गुन्हे दाखल करण्यात आले. गँगस्टर दीपक नंदालचा शोध सुरू असून त्याच्या नेटवर्कचाही तपास केला जात आहे.

### उद्योगपतीच्या घरावर गोळीबार

रात्री सुमारे ९.५० वाजता आरोपी स्कॉर्पिओमधून उद्योगपतीच्या घराबाहेर पोहोचले. वाहनाचा नंबर कॅमेऱ्यांपासून लपवण्यासाठी नंबर प्लेटवर काळी टेप लावण्यात आली होती. आरोपींनी घराच्या आवारातील गाड्या तसेच पहिल्या मजल्यावरील बाल्कनी आणि खिडक्यांवर गोळीबार केला. त्यावेळी उद्योगपतींचे कुटुंबीय घरात उपस्थित होते. सुदैवाने या हल्ल्यात कोणालाही दुखापत झाली नाही.

---

# न्यूझीलंडमध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक, सांगितली खास आठवण

महाईन्यूज । न्यूझीलंड

**पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी आज न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे भारतीय समुदायाच्या एका कार्यक्रमात हजेरी लावली आणि त्यांना संबोधित केले. या सामुदायिक कार्यक्रमात भारतीय समुदायाप्रती आपला आनंद व्यक्त करताना पंतप्रधाननरेंद्र मोदी म्हणाले, "आज ४० वर्षांनंतर एका भारतीय पंतप्रधानांनी न्यूझीलंडला भेट दिली आहे. १४० कोटी भारतीयांच्या शुभेच्छा तुमच्यापर्यंत पोहोचवणे हे माझे मोठे सौभाग्य आहे.**



### तो मफलर मी आजही सोबत ठेवलाय: पंतप्रधान मोदी

तेव्हाची आठवण सांगता पंतप्रधान भावूक होऊन म्हणाले, "पंतप्रधान म्हणून ही माझी पहिलीच भेट असेल, पण २५-३० वर्षांपूर्वी, जेव्हा मी कोणत्याही सरकारचा भाग नव्हतो आणि सार्वजनिक जीवनात अज्ञात होतो, तेव्हा मला न्यूझीलंडला भेट देण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी मला भेट म्हणून एक मफलर, एक टोपी आणि हातमोज्यांची एक जोडी मिळाली होती. आज मी तोच मफलर घालून तुमच्यामध्ये आलो आहे. न्यूझीलंडमधील एका मित्राने मला २५-३० वर्षांपूर्वी तो भेट दिला होता.

" या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदींनी मंचावरून एक अशी आठवण सांगितली, जी सर्वांच्या हृदयाला स्पर्शून गेली. त्यांनी २५-३० वर्षांपूर्वीच्या एका आठवणीला उजाळा दिला, जेव्हा ते सक्रिय भारतीय राजकारण किंवा सरकारचा भाग नव्हते आणि सार्वजनिक जीवनात फारसे प्रसिद्ध नव्हते.

"भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील राजकीय आणि सांस्कृतिक संबंध मजबूत आहेत. या संबंधांचा पाया खूप खोलवर रुजलेला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्या संबंधांमध्ये आठवणी, मैत्री, मूल्ये आणि वचनबद्धता आहे. भारत आणि न्यूझीलंड यांचे संबंध मैत्री, समान मूल्ये आणि परस्पर वचनबद्धतेवर आधारित आहेत. न्यूझीलंडच्या संस्कृतीतील एक सुंदर शब्द या संबंधांचे सार व्यक्त करतो: 'वाका'. शतकानुशतके हा शब्द लोकांना एकत्र आणण्याचे प्रतीक राहिला आहे. 'वाका' ही केवळ एक बोट नाही. ती एका सामायिक प्रवासाचे प्रतीक आहे. आज, भारत-न्यूझीलंड 'वाका' एकत्र एका नवीन प्रवासाला निघण्यासाठी सज्ज आहेत," असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यासाठी न्यूझीलंडमध्ये दाखल झाले. या दौऱ्यात ते न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्याशी चर्चा करणार आहेत. प्रामुख्याने भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करार हा विषय या दौऱ्यात केंद्रस्थानी असणार आहे. पंतप्रधान मोदी हे या दौऱ्यात सुमारे चाळीस हजार भारतीयांना संबोधित करणार आहेत. येथील विमानतळावर आगमन झाल्यावर पंतप्रधान मोदींचे स्वागत खुद्द लक्सन यांनी केले. मुख्य म्हणजे तब्बल चाळीस वर्षांनंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांनी न्यूझीलंडला दिलेली ही ऐतिहासिक भेट ठरली आहे.

मोदी म्हणाले की, त्यांच्या न्यूझीलंड दौऱ्यामुळे भारताचे 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी', 'महासागर व्हिजन' तसेच मुक्त आणि खुल्या इंडो-पॅसिफिकबाबतचा दृष्टिकोन अधिक मजबूत होईल. न्यूझीलंडच्या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान, ते आर्थिक, व्यापारी आणि व्यावसायिक संबंध अधिक वाढवण्याच्या मार्गांवर लक्सॉन यांच्याशी चर्चा करणार आहेत.



## सिनेसृष्टीवर शोककळा!

सिनेसृष्टीतून एक अत्यंत दुःखद आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि छायाचित्रकार (सिनेमॅटोग्राफर) आर. चेझियान यांचे शुक्रवारी निधन झाले. ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या जाण्याने दाक्षिणात्य आणि भारतीय चित्रपटसृष्टीचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले असून, सिनेसृष्टीतून हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आर.चेझियान हे गेल्या काही काळापासून गंभीर आजाराने ग्रस्त होते. गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न सुरू असतानाच उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर आणि चाहत्यांवर दुखाचा डोंगर कोसळला आहे. मूळचे तामिळनाडूतील शिवगंगा जिल्ह्यातील नट्टरसनकोट्टाई येथील रहिवासी असलेले आर. चेझियान हे पडद्यामागील खरे 'जादूगार' होते. चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवण्यापूर्वी ते पेशाने इंजिनिअर होते. मात्र, कलेची आवड असल्याने त्यांनी सिनेविश्वाची वाट धरली. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर पी. सी. श्रीराम यांच्याकडे साहाय्यक म्हणून केली.



# आकांक्षाची कबुली

अभिनेत्री आकांक्षा चमोला सध्या 'लॉक अप सीजन २' या रिॲलिटी शोमुळे प्रचंड चर्चेत आहे. नुकतेच तिने या शोमध्ये तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. काही दिवसांपूर्वीच तिने गौरव खन्नासोबत घटस्फोट घेत असल्याचे सांगितले होते, तर आता तिने स्वतःच्या लैंगिक ओळखीबाबत मोठा खुलासा केला आहे. शोमधील स्पर्धक श्रेया कालराने आकांक्षाच्या 'बायसेक्शुअल' असण्याबाबत चर्चा केली होती. हा व्हिडीओ होस्ट फराह खान आणि रितेश देशमुख यांनी आकांक्षाला दाखवला, तेव्हा ती भावुक झाली. त्यानंतर आकांक्षाने स्वतः जाहीरपणे कबूल केले की, लग्नापूर्वी ती बायसेक्शुअल होती आणि काही मुलींसोबत तिचे रिलेशनशिपही होते. आकांक्षा म्हणाली की, तिला नेहमीच महिलांसोबत सुरक्षित वाटायचे. लोक याला 'बायसेक्शुअल' म्हणत असले, तरी ती याकडे फक्त एक भावनिक नाते म्हणून पाहते. रितेशने आकांक्षाच्या धैर्याचे कौतुक करत म्हणाला, "आपण समाजात राहतो, त्यामुळे निकाल दिले जातात, न्यायाधीश असतात, पण तू इथे येऊन हे व्यक्त करत आहेस, त्यामुळे मला तुला अधिक धैर्य द्यायचे आहे. मी फक्त एवढंच म्हणू शकतो." रितेशचे शब्द ऐकून आकांक्षाला रडू कोसळले, पण मग एका सह-स्पर्धकाने तिला मिठी मारून धीर दिला.



# सूर्यासोबत झळकणार कायाडू

दक्षिणेतील दमदार अभिनेता सूर्याचा 'करुप्पू' चित्रपट यशस्वी ठरला आहे. याचदरम्यान त्याला आणखी एक चित्रपट मिळाला आहे. होम्बले फिल्म्सने अधिकृतपणे स्वतःच्या पुढील महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टची घोषणा केली असून यात सूर्या महत्त्वाच्या भूमिकेत असेल तर त्याच्यासोबत कायाडू लोहार नायिका म्हणून झळकणार आहे. या चित्रपटाला साई. अभ्यंकर याचे संगीत लाभणार आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण सुरू करण्यात आले आहे. कायाडू लोहारसाठी हा चित्रपट अत्यंत मोठी संधी ठरणार आहे. कायाडूने यापूर्वीच स्वतःची अभिनयक्षमता सिद्ध केली आहे. आता तिला सूर्यासोबत काम करता येणार असल्याने तिच्या अभिनयाचा कस लागणार आहे. सूर्याने 2 दशकांपेक्षा अधिक काळात स्वतःच्या दमदार अभिनयाद्वारे प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. दोन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि 7 फिल्मफेयर पुरस्कार पटकाविणाऱ्या सूर्याने नेहमीच व्यावसायिक यश आणि दमदार कथांदरम्यान एक उत्तम संतुलन राखले आहे.



# अवघ्या २ मिनिटांत सामना फिरला!

## बेल्जियमचा धुव्वा उडवत स्पेन सेमी फायनलमध्ये..



**महाईन्यूज । स्पेन**

**फिफा वर्ल्डकप स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. या स्पर्धेतील क्वार्टर फायनलच्या सामन्यांना सुरुवात झाली आहे. फ्रान्सने आधीच सेमी फायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. तर दुसऱ्या क्वार्टर फायनलच्या सामन्यात स्पेनने बेल्जियमचा धुव्वा उडवत सेमी फायनलमध्ये दमदार प्रवेश केला आहे. लॉस एंजेलिस स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात स्पेनने २-१ ने बाजी मारली. दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत सुरू होती. पण पुन्हा एकदा सुपर सब्स्टिट्यूट म्हणून मैदानात उतरलेल्या मिकेल मेरिनोने ८८ व्या मिनिटाला निर्णायक गोल केला आणि स्पेनला २-१ ने विजय मिळवून देत सेमी फायनलमध्ये प्रवेश मिळवून दिला.**

हा विजय स्पेनसाठी अतिशय खास आहे. कारण गेल्या ३६ सामन्यांपासून स्पेनने आपली विजयी मालिका सुरू ठेवली आहे. सेमी फायनलमध्ये स्पेनचा सामना बलाढ्य फ्रान्सविरुद्ध होणार आहे. दोन्ही संघ दमदार फॉर्ममध्ये आहेत. त्यामुळे हा या स्पर्धेतील सर्वात रोमांचक सामना असू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. कोणता संघ बाजी मारणार आणि अंतिम फेरीत प्रवेश करणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

या सामन्यात स्पेनकडून रुईज आणि मेरीनोने २ निर्णायक गोल केले. स्पेनचा सर्वाधिक चर्चेत असलेला खेळाडू लामिन यामलला एकही गोल करता आला नाही. पण त्याने बेल्जियमच्या खेळाडूंना पूर्ण सामन्यात गुंतवून ठेवलं आणि स्पेनला गोल करण्याची संधी निर्माण करून दिली.

या सामन्यात स्पेनच्या प्रशिक्षकांनी धाडसी निर्णय घेत, पेड्रीला विश्रांती देऊन, फॅबियन रुईजला मैदानात उतरण्याची संधी दिली. हा निर्णय अतिशय योग्य ठरला. कारण सुरुवातीच्या ३० व्या मिनिटाला रुईजने गोल करून स्पेनला १-० ने आघाडी मिळवून दिली. त्यानंतर यामालने गोल करण्याची संधी निर्माण करून दिली होती. पण ही संधी थोडक्यात हुकली.

पहिल्या हाफ संपणार त्याआधीच बेल्जियमने दमदार पुनरागमन केलं. डी केटेलारेने ४१ व्या मिनिटाला दमदार गोल केला आणि बेल्जियमला १-१ ने बरोबरीत आणलं. त्यानंतर दोन्ही संघ गोल करण्यासाठी संघर्ष करताना दिसून आले. त्यानंतर जवळपास ३० मिनिटे एकही गोल झाला नव्हता. शेवटी ८८ व्या मिनिटाला मिकेल मेरिनोने दमदार गोल केला आणि स्पेनला २-१ ने आघाडी मिळवून दिली. मुख्य बाब म्हणजे तो ८६ व्या मिनिटाला मैदानात उतरला होता. बेल्जियमचा संघ बरोबरी करू शकला नाही. शेवटी स्पेनने हा सामना २-१ च्या फरकाने जिंकून सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे.

# भारतीय संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये होणार मोठा फेरबदल?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये लवकरच मोठे बदल होण्याची शक्यता आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखालील कोचिंग स्टाफमधील किमान एक महत्त्वाचा सदस्य पद सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित सदस्याच्या पद सोडण्यामागचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सध्याच्या भूमिकेबाबत वाढते असमाधान, दुसऱ्या संघात प्रशिक्षकपदाची संधी किंवा या दोन्ही कारणांमुळे हा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी चर्चा आहे.**

गौतम गंभीर यांच्या नेतृत्वाखालील कोचिंग स्टाफने जुलै २०२४ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेपासून भारतीय संघाची जबाबदारी स्वीकारली होती. गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल यांनी इतर प्रशिक्षकांपेक्षा थोड्या उशिराने, बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये प्रवेश केला होता. तर उर्वरित सपोर्ट स्टाफने गौतम गंभीर यांच्यासोबतच आपल्या कार्यकाळाची सुरुवात केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, बीसीसीआयने सपोर्ट स्टाफबरोबर २+१ वर्षांचा करार केला होता. सुरुवातीच्या



दोन वर्षांनंतर दोन्ही पक्षांच्या संमतीने करार एका वर्षासाठी वाढवण्याचा पर्याय आहे. मात्र, कोचिंग स्टाफमधील किमान एका सदस्याने जागतिक स्तरावर उपस्थिती असलेल्या एका आयपीएल फ्रँचायझीसोबत चर्चा केल्याचं समजलं असून, ते लवकरच त्या संघात रुजू होण्याची शक्यता आहे.

याशिवाय, सपोर्ट स्टाफमधील आणखी एखादा सदस्यही लवकरच पद सोडू शकतो, अशीही चर्चा भारतीय क्रिकेट वर्तुळात सुरू आहे. या वृत्ताबाबत टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया, संबंधित प्रशिक्षक आणि संबंधित आयपीएल फ्रँचायझीशी संपर्क साधला आहे. त्यांच्या प्रतिक्रियेनंतर या प्रकरणाबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

मात्र, सपोर्ट स्टाफमधील संभाव्य बदलांचा भारताच्या आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या निराशाजनक कामगिरीशी थेट संबंध नसल्याचं समजत आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या घडामोडींमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर झालेल्या दोन कसोटी सामन्यांच्या पराभवानंतर ड्रेसिंग रूममधील मतभेद अधिक तीव्र झाले आहेत. सध्या संघातील वातावरणही फारसं समाधानकारक नसल्याचं बोललं जात आहे. त्यातच निवड समिती आणि प्रशिक्षकांमधील मतभेदांमुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे.

दरम्यान, साईराज बहुतुले यांची स्पिन गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून करण्यात आलेली नियुक्ती ही केवळ तात्पुरती व्यवस्था नसल्याचंही समजत आहे. यापूर्वी २०२४ मध्ये श्रीलंका दौऱ्यावर मॉर्ने मॉर्केल कौटुंबिक कारणांमुळे संघासोबत जाऊ शकला नव्हता. त्यावेळी बहुतुले यांनी हंगामी गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळली होती.

अधिकृत माहिती मिळालेली नसली तरी सपोर्ट स्टाफमधील संभाव्य बदल लक्षात घेऊनच बीसीसीआयने झिम्बाब्वे दौऱ्यासाठी वेगळ्या प्रशिक्षकांची नियुक्ती केल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. झिम्बाब्वे दौरा व आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी व्ही व्ही एस लक्ष्मण आणि त्यांच्या नेतृत्त्वाखालील कोचिंग स्टाफ संघासोबत जाण्याची शक्यता आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात भारतीय संघाच्या अलीकडील कामगिरीचा आढावा घेतला जाईल, मात्र त्याव्यतिरिक्त कोणत्याही विषयावर चर्चा होणार नसल्याचं स्पष्ट केलं. "इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या मालिकेत भारतीय टी-२० संघाची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. मात्र, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये असे चढ-उतार येत असतात. आम्ही याकडे तात्पुरता खराब काळ म्हणून पाहत आहोत. १९ जुलैला एकदिवसीय मालिका संपल्यानंतर आणि संघ भारतात परतल्यानंतर आम्ही संघाच्या प्रमुख सदस्यांसोबत आढावा बैठक घेऊ. इंग्लंड दौऱ्यात नेमकं काय चुकलं, याचा सखोल आढावा घेतला जाईल. सध्या एकदिवसीय मालिका बाकी असल्याने संघ पुनरागमन करेल, अशी आम्हाला आशा आहे," असं सैकिया म्हणाले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 12 जुलै 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## तथ्यांची पडताळणी न करताच आरोपांचा पाऊस

## दुर्दैवी दुर्घटनेचे राजकीय भांडवल करण्याची स्पर्धा सुरू?

# मोशी दुर्घटना अन् राजकीय नेत्यांचे अज्ञान!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो येथे झालेली दुर्घटना ही केवळ पिंपरी-चिंचवड नव्हे, तर संपूर्ण राज्याला हादरवून सोडणारी घटना आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर कचऱ्याचा मोठा भाग वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळला आणि त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपला जीव गमवावा लागला. अनेक तास एनडीआरएफ, अग्निशमन दल, पोलीस आणि विविध यंत्रणांनी जीवाची बाजी लावत बचावकार्य केले.**

मात्र, बचावकार्य सुरू असतानाच आणि दुर्घटनेची अधिकृत चौकशी सुरू होण्यापूर्वीच विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू केली. विशेष म्हणजे, या अनेक विधानांमध्ये तांत्रिक माहितीचा अभाव, वस्तुस्थितीबाबत चुकीचे संदर्भ आणि नियमांविषयी अपूर्ण माहिती असल्याचे दिसून आले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी विधानसभेत बोलताना, "कचरा डेपोशेजारील रहिवासी इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळला," असे विधान केले. मात्र, प्रत्यक्षात ज्या इमारतीवर कचरा कोसळला ती कोणतीही रहिवासी इमारत नव्हती. ती वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची प्रशासकीय (ॲडमिन) इमारत होती. त्या ठिकाणी प्रकल्पातील कर्मचारी काम करत होते. विधानसभेसारख्या सर्वोच्च लोकशाही संस्थेत वस्तुस्थितीची पडताळणी न करता अशी माहिती मांडली गेल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले.

भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी, "कचरा डेपोवर २० मीटर उंचीची मर्यादा असताना त्यापेक्षा जास्त उंचीचे डोंगर का उभे केले?" असा प्रश्न उपस्थित केला.

त्याच धर्तीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी, "२० ते २५ मीटर उंचीपर्यंतच लँडफिलिंग करण्याची मर्यादा असताना ३० ते ३५ मीटर उंच कचऱ्याचे ढिगारे कसे तयार झाले?" असा सवाल उपस्थित केला.

मात्र, कचरा डेपो किंवा सॅनिटरी लँडफिलसाठी देशभर लागू होणारा "२० किंवा २५ मीटर" असा कोणताही सार्वत्रिक कायदेशीर नियम उपलब्ध नाही. लँडफिलची रचना, उंची, उतार, स्थिरता, मातीचे स्वरूप, भू-तांत्रिक अभ्यास, पर्यावरणीय मंजुरी, डिझाईन आणि स्थानिक परिस्थिती यावर अंतिम उंची अवलंबून असते. त्यामुळे अशा प्रकारचे दावे करण्यापूर्वी तांत्रिक बाबींचा अभ्यास आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. भारतातील विद्यमान घनकचरा व्यवस्थापन नियमांमध्ये "कचऱ्याचा ढिग जास्तीत जास्त 20 मीटर किंवा 25 मीटरच असावा" असा सर्वत्र लागू होणारा स्पष्ट नियम नाही.



### आंदोलन की बचावकार्य?

शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाच्या उपनेत्या सुलभा उबाळे यांनी महापालिका आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या दूरध्वनी संभाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून आपली भूमिका अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, या संभाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत, "सध्या आंदोलन करण्यापेक्षा घटनास्थळी जाऊन बचावकार्याला मदत करा. दोषींवर चौकशीनंतर कारवाई होईल; पण या क्षणी जीव वाचवणे अधिक महत्त्वाचे आहे," असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राजकीय भूमिका आणि प्रशासनाला सहकार्य यामधील प्राधान्यक्रमाचाही प्रश्न उपस्थित झाला.

### वेस्ट टू एनर्जी प्रकल्प डेपोमध्ये नसेल तर कुठे असणार?

शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी, "कचरा डेपोच्या आवारात प्रकल्पाची इमारत उभारणेच चुकीचे होते," असे मत व्यक्त केले. मात्र, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचा मूलभूत उद्देशच शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून वीज निर्मिती करणे हा आहे. त्यामुळे असा प्रकल्प आणि त्याची प्रशासकीय इमारत कचरा प्रक्रिया केंद्राच्या परिसरातच असते. देशभरातील अशा बहुतांश प्रकल्पांमध्ये हीच कार्यपद्धती आहे. त्यामुळे हा आरोपही तांत्रिक वास्तवाशी कितपत सुसंगत आहे, यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, या प्रकल्पाचे लोकार्पण झाले. त्यावेळी पुण्यातील व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोबत खासदार श्रीरंग बारणे शहराचे खासदार म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

### दुर्घटना की राजकीय संधी?

मोशी कचरा डेपोचा प्रश्न हा एका दिवसात निर्माण झालेला नाही. अनेक दशकांपासून साचलेला लेगसी वेस्ट, वाढती लोकसंख्या, दररोज निर्माण होणारा हजारो मेट्रिक टन घनकचरा, त्यावरील प्रक्रिया क्षमता, बायोमायनिंग, वेस्ट टू एनर्जी प्रकल्प, मुसळधार पाऊस आणि भू-तांत्रिक स्थैर्य अशा अनेक घटकांशी हा विषय संबंधित आहे. अशा गुंतागुंतीच्या विषयावर अधिकृत चौकशीपूर्वीच निष्कर्ष काढणे, चुकीची माहिती देणे किंवा तांत्रिक आधार नसलेले दावे करणे हे जनतेची दिशाभूल करणारे ठरू शकते. त्याऐवजी दुर्घटनेमागील नेमकी कारणे शोधणे, जबाबदारी निश्चित करणे, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे हीच खरी गरज आहे. दुर्दैवाने, या दुर्घटनेनंतर अनेक राजकीय नेत्यांनी तथ्यांपेक्षा आरोपांना आणि अभ्यासापेक्षा प्रसिद्धीला अधिक महत्त्व दिल्याचे चित्र दिसले. त्यामुळे एक प्रश्न उपस्थित होतो—दुर्घटनेतून धडा घेण्याऐवजी आपण तिचे राजकीय भांडवल करण्याची स्पर्धा तर करत नाही ना? दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले कामगार कोणत्याही पक्षाचे नव्हते; ते कर्तव्य बजावत असलेले कर्मचारी होते. त्यांच्या मृत्यूचे राजकीय भांडवल करण्यापेक्षा त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देणे आणि भविष्यात अशी दुर्घटना पुन्हा होणार नाही याची हमी देणे, हीच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची खरी जबाबदारी आहे.

### प्रकाश आंबेडकरांची जहाल टीका

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीही या दुर्घटनेवरून सत्ताधारी भाजपवर थेट हल्लाबोल केला. "नगरसेवकांना कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गाडा," अशा आशयाची त्यांनी सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया दिली. दुर्घटनेच्या कारणांचा तपास सुरू असतानाच अशा प्रकारच्या राजकीय भाषामुळे वातावरण आणखी तापणार आहे. वास्तविक, नैसर्गिक आपत्ती असताना त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न अनुभवी नेत्यांकडून केला जातो आहे, हे स्पष्ट झाले.

# मोशी दुर्घटनेत अडकलेल्या ८ जणांचा मृत्यू

## एनडीआरएफ आणि बचाव पथकाने काँक्रिटचा भाग फोडून शोधले मृतदेह

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा डोंगर कोसळून इमारत ढासळल्याच्या दुर्घटनेत कचऱ्याखाली दबलेल्या सात जणांचे मृतदेह चौथ्या दिवशी शनिवारी सापडले. इमारतीच्या बाजूला दुसरीकडे कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या एका व्यक्तीचा शोध सुरू आहे. आतापर्यंत या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला आहे.**



मोशी दुर्घटनेत कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या नऊ कामगारांची बुधवारी सुखरूप सुटका करण्यात आली होती. गुरुवारी सकाळी भावेश वाणी यांचा मृतदेह सापडला होता. ढिगाऱ्याखाली दबलेल्या आठ कामगारांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मार्गदर्शनाखाली बचाव कार्य राबविण्यात येत होते. दुर्घटनाग्रस्त इमारतीचा काँक्रिटचा भाग फोडून शनिवारी शोधकार्य राबविण्यात आले. त्यामध्ये सात जणांचे मृतदेह सापडले. अक्षय सावंत (वय ३५, रा.मोशी) सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (वय २२, मोशी) आणि राहुल गायकवाड यांचे मृतदेह सापडले आहेत. त्यांच्या मृतदेहांचे वायसीएम रुग्णालयात शवविच्छेदन केले जाणार आहे. त्यानंतर पोलिसांकडून मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत.

कचऱ्याचा ढिगारा कोसळल्याने इमारत ढासळली होती. या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा अडकला होता. जेवढा कचरा उचलला जात होता, तेवढा कचरा डोंगरावरून कोसळत होता. कचऱ्याचा ढिगारा उपसताना यंत्रणांची दमछाक झाली होती. जेसीबी, पोकलेन आणि डंपरच्या माध्यमातून कचरा हटविण्यात आला. तीन दिवसांच्या शोध कार्यानंतरही कोणाचाही शोध लागत नसल्याने शनिवारी दुर्घटनाग्रस्त इमारतीचा काँक्रिटचा भाग फोडण्यात आला. त्यामुळे जवानांना आतमध्ये शिरण्यासाठी मार्ग मिळाला. त्यानंतर दुपारपासून मृतदेह सापडण्यास सुरुवात झाली. दुपारी अडीच वाजता एक मृतदेह सापडला. आठ वाजेपर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले. अखेर ३ दिवसांनंतर त्यापैकी ८ जणांचे मृतदेह प्रशासनाच्या हाती आले आहेत. तर अजून एकाचा शोध सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### शोधकार्य सुरूच

इमारतीच्या बाजूला असलेल्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या वामन कसबे यांचा शोध सुरू असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले. कसबे हे कचरा डेपोतील रस्त्यावरून खाली उतरत होते. त्यावेळी त्यांच्या अंगावर कचऱ्याचा ढीग पडले आहेत. त्यांचा रात्री उशिरापर्यंत शोध सुरू होता. मोशी येथील कचरा डेपोत ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांची चिंता आणि त्यांच्या कुटुंबांचा जीवघेणा संघर्ष वेदनादायी आणि अंगावर काटा आणणारा होत चालला होता. अथांग पसरलेल्या कचऱ्याच्या डोंगराकडे डोळे लावून बसलेल्या नातेवाइकांच्या डोळ्यांतील अश्रू आता सुकले होते.

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे सौदागर परिसरातील पारस रिव्हेरा सोसायटीलगत मुरकुटे यांच्या शेताजवळील विजेची मुख्य विद्युत वाहिनी (मेन लाईन) अचानक तुटून नदीपात्रात कोसळल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, नगरसेवक तथा भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे आणि संबंधित यंत्रणांच्या तातडीच्या कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला.**





नागरिकांच्या जीवितापेक्षा महत्त्वाचे काहीही नाही. नदीपात्रात मुख्य विद्युत वाहिनी कोसळल्याची माहिती मिळताच आम्ही तातडीने महावितरण, महापालिकेचे अग्निशमन दल आणि संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून बचावकार्य सुरू केले. सर्व विभागांनी समन्वयाने काम केल्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. नागरिकांनी अशा धोकादायक परिस्थितीत नदीपात्र किंवा विद्युत तारा असलेल्या परिसरात जाण्याचे टाळावे आणि कोणतीही आपत्कालीन घटना आढळल्यास तात्काळ प्रशासनाला माहिती द्यावी. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही कायम तत्पर आहोत.

**– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

घटनेची माहिती मिळताच शत्रुघ्न काटे यांनी तातडीने महावितरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बचावकार्य सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर अग्निशमन दल, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी, विशेष रेस्क्यू टीम आणि बोट घटनास्थळी दाखल झाली. नदीपात्रात विद्युत प्रवाह उतरल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रथम वीजपुरवठा सुरक्षितपणे बंद करण्यात आला. त्यानंतर अत्यंत सावधगिरी बाळगत तांत्रिक कौशल्याच्या आधारे नदीपात्रात पडलेली मुख्य विद्युत वाहिनी सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आली.

या संपूर्ण कारवाईदरम्यान शत्रुघ्न (बापू) काटे यांनी स्वतः घटनास्थळी परिस्थितीवर लक्ष ठेवत यंत्रणांशी सातत्याने समन्वय साधला. नगरसेविका सौ. अनिताताई काटे आणि नगरसेविका सौ. कुंदाताई भिसे यांनीही प्रशासनाशी संपर्क ठेवून बचावकार्यासाठी आवश्यक पाठपुरावा केला. स्थानिक नागरिकांनी वेळेवर घेतलेल्या या निर्णयांचे आणि प्रशासनाच्या जलद प्रतिसादाचे स्वागत केले असून, योग्य वेळी समन्वय साधल्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त केली.



# सातवी जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धा उत्साहात

## २० शाळांतील १८५ खेळाडूंचा सहभाग; अरींजय मार्शल आर्ट्स संघ प्रथम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



**पिंपरी-चिंचवड येथे सातवी जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात आणि शिस्तबद्ध नियोजनासह पार पडली. जिल्ह्यातील सुमारे २० शाळांमधील १८५ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला.**

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, क्रीडा समिती सदस्य तानाजी बारणे, महापालिकेचे क्रीडा अधिकारी दीपक कान्हेरे तसेच विद्यालय काळेवाडीच्या मुख्याध्यापिका हट्टे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना क्रीडेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पिंपरी-चिंचवड युनिफाईट संघटना खेळाच्या प्रसारासाठी करत असलेल्या कार्याचे कौतुक केले. शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या युनिफाईट खेळाडूंच्या संख्येचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले.

स्पर्धेत पिंपरी-चिंचवडमधील पाच संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या निकालानुसार अरींजय मार्शल आर्ट्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला. शौर्य मार्शल आर्ट संघ द्वितीय, तर अल्टिमेट स्पोर्ट्स मार्शल आर्ट्स संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. 'शिस्तबद्ध संघ' म्हणून श्री साई गणेश स्पोर्ट्स क्लबला विशेष गौरविण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन अविनाश पवार, शंकर साबळे, अभिषेक सर आणि प्रफुल सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पिंपरी-चिंचवडचे टेक्निकल डायरेक्टर संदीप माने आणि त्यांचे सहकारी गौतम प्रजापती, विकास यादव, सौरभ माने, चैतन्य रेणवा, सुजल काळे, अथर्व कावरे, नचिकेत अंधारे, अनुज काकडे, देव लोट, धीरा माने, श्रावणी माने, संस्कृती राऊत, हर्षित तिवारी, योगिता बोराडे आणि प्रणव माने यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

पिंपरी-चिंचवडमध्ये युनिफाईट खेळाची वाढती लोकप्रियता पाहून महाराष्ट्र राज्य युनिफाईट संघटनेचे अध्यक्ष संतोष खंदारे आणि सचिव मंदार पनवेलकर यांनी पिंपरी-चिंचवड संघटनेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पिंपरी-चिंचवड युनिफाईट संघटनेचे अध्यक्ष यशवंत माने यांनी ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंना शुभेच्छा देत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले.



# JSPM कॉलेजच्या सांडपाण्याने सोसायटीधारक रहिवासी हैराण!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

ताथवडे येथील नोव्हा रेसिडेन्सी को-ऑप. हाऊसिंग सोसायटीने JSPM महाविद्यालयाच्या ड्रेनेज लाईनमधून सातत्याने दूषित सांडपाणी सोसायटीच्या परिसरात येत असल्याचा गंभीर आरोप करत पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. याबाबत सोसायटीने आयुक्त, आरोग्य विभाग आणि जलनिस्सारण विभागाला शनिवारी (११ जुलै) लेखी निवेदन सादर केले.

निवेदनानुसार, २०२३ पासून JSPM महाविद्यालयाच्या मुख्य ड्रेनेज लाईनमधून वारंवार गळती होत असून, दूषित सांडपाणी नोव्हा रेसिडेन्सीच्या आवारात आणि मागील बाजूस साचत आहे. गेल्या पाच दिवसांपासून ही समस्या पुन्हा तीव्र झाली असून परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि डासांचा प्रादुर्भाव वाढल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे.

सोसायटीच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा JSPM प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या. मात्र, प्रत्येकवेळी केवळ तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी, परिसरातील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सोसायटीत लहान मुले, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिकांसह सुमारे ६५ कुटुंबे वास्तव्यास असल्याने दूषित पाण्यामुळे कॉलरा, कावीळ, डेंग्यूसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या चिमुरड्यांनी घडवले विठ्ठलनामाच्या जयघोषात 'स्वच्छता आणि पर्यावरण' रक्षणाचे प्रबोधन!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



**येथील 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल'च्या वतीने शनिवार रोजी आषाढी वारी निमित्त भव्य आणि विलोभनीय दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे संपूर्ण थेरगाव परिसर विठ्ठलनामाच्या जयघोषाने आणि भक्तीरसाने न्हाऊन निघाला होता.**

दिंडीसाठी आकर्षक फुलांची सजावट केलेली भव्य पालखी, अबदागिरी, छत्र्या, आणि भगवे झेंडे मुख्य आकर्षण ठरले. ढोल-ताशांचा गजर आणि लेझीमच्या तालावर विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन नाचत होते. शाळेतील सर्व मुला-मुलींनी पारंपरिक व सांस्कृतिक पोशाख परिधान केला असल्यामुळे संपूर्ण थेरगाव परिसरात एक वेगळाच रंग भरला होता. हा सोहळा इतका जिवंत आणि वास्तविक होता की, थेरगावमधील आबालवृद्ध आणि महिला वर्गाने ठिकठिकाणी पालखी थांबवून मनोभावे औक्षण केले व विठ्ठलाचे दर्शन घेतले.

केवळ भक्तीच नव्हे, तर समाजात जागृती निर्माण करण्याचा संदेशही या दिंडीतून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हातामध्ये 'स्वच्छता राखा', 'पाणी वाचवा', 'वृक्ष लागवड करा', 'आपला परिसर स्वच्छ ठेवा' अशा विविध सामाजिक घोषणांचे फलक होते. अध्यात्माची सांगड घालून काळाची गरज असलेले हे ज्ञान समाजापर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे काम या चिमुरड्यांनी केले.

दिंडीची सुरुवात करताना पालखीचे विधीवत पूजन संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, सचिव श्री. अशोक मोरे सर, खजिनदार सौ. सुरेखा पवार मॅडम, उपाध्यक्ष श्री. निलेश पलघोमल सर व उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम, नायगम इग्रिस मॅडम आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मुलांचा अथांग उत्साह पाहून उपस्थित मान्यवरांनाही विठ्ठलनामाचा जयघोष करण्याचा मोह आवरला नाही. दिंडीदरम्यान सर्व शिक्षक, शिक्षिका आणि मोठ्या विद्यार्थिनींनी रस्त्यावरच फुगडीचा फेर धरला. या फुगडीमुळे पालखी सोहळ्याचा आनंद आणि उत्साह द्विगुणीत झाला. अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात हा दिंडी सोहळा संपन्न झाला.

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX AKURDI, PUNE

**43** Years of Excellence in Education

## Your Pathway to Leadership Begins at D Y PATIL

## ADMISSIONS OPEN 2026-27

### Our Institutes

**COLLEGE OF ENGINEERING** (AUTONOMOUS)
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & **NBA** NRI Quota Available
**UC**- Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A
**PG**- Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A
**PhD**- Mech / ENTC / Civil

**INSTITUTE OF MCA & MANAGEMENT**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Affiliated to SPPU
MCA / MBA / PhD (Management)

**COLLEGE OF ARCHITECTURE**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Approved by COA
B.Arch / M.Arch (Construction Management) / D.Arch

**PGDM INSTITUTE**
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
NRI Quota Avaliable
**Specializations:** Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics & Business Analytics with AI / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management

**COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT**
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
BSc (Hons) Agri Business Management

**COLLEGE OF PHARMACY**
Accredited by **NBA** & **NAAC** with **'A+'** Grade
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
D.Pharm / B.Pharm / Pharm D. / M.Pharm (Pharmaceutics) / M.Pharm (Pharmaceutical Quality Assurance) / M.Pharm (Pharmaceutical Chemistry) / M.Pharm (Pharmacology) / M.Pharm (Regulatory Affairs) / M.Pharm (Phytopharmacy & Phytomedicine)

**INSTITUTE OF PHARMACY**
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
D.Pharm

**Y B PATIL POLYTECHNIC**
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
(Accredited by **NBA**)
Diploma in Civil / Mech / Comp / E&C

### Why Choose Us?

- Green & Modern Campus
- Smart Classrooms & Digital Learning
- Experienced Faculty & Excellence
- Global University Collaborations
- Wi-Fi Campus & Modern Facilities
- Sports, Cafeteria & Auditorium
- Safe & Disciplined Environment
- International Academic Tours
- Modern Boys & Girls Hostels
- DYP Dnyansagar Incubation Foundation

**Address:** Sector No. 29, Nigdi Pradhikaran, Akurdi, Pune 411044, Maharashtra, India
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
**9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999**

REGISTER HERE